**पुस्तिका -आठ**

**एखादया प्राधिकरणाचा भाग म्हणून अथवा त्यास सल्ला देण्यासाठी घटित केलेल्या दोन किंवा अधिक व्यक्तिंच्या मिळून बनलेल्या मंडळांचे, परिषदांचे, समित्यांचे आणि निकायांचे विवरण आणि सदर समित्या मंडळ, परिषदा, कार्य करणारी मंडळे आणि अन्य निकाय हयांच्या सभा जनतेसाठी खुल्या आहेत काय हयाबाबतचे विवरण.**

## महानगरपालिकेची रचना*

मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ५ (१) (अ) अन्वये, महानगरपालिका ही प्रभाग निवडणुकांमध्ये थेट निवडून आलेल्या २२७ सदस्यांची मिळून बनलेली असते आणि सदर अधिनियमाच्या ५ (१) (ब) अन्वये, महानगरपालिका, महानगरपालिका प्रशासनविषयक विशेष ज्ञान किंवा अनुभव असलेल्या पाच सदस्यांचे नामनिर्देशित सदस्य म्हणून विहित पध्दतीनुसार नामनिर्देशन करते.

मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ४ अन्वये, तरतुदी अंमलात आणण्याचे काम महानगरपालिकेच्या ९ प्राधिकरणांकडे सोपविण्यात आले आहे. ती प्राधिकरणे पुढीलप्रमाणे आहेत:-

१) महानगरपालिका,

२) स्थायी समिति,

३) सुधार समिति,

४) बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समिति,

५) शिक्षण समिति,

६) प्रभाग समिति,

७) महापौर,

८) महानगरपालिका आयुक्त आणि

९) बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमांचा महाव्यवस्थापक.

मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३८ (अ) (१) अन्वये तरतूद केल्यानुसार, महानगरपालिका वेळोवेळी आपल्या सदस्यांमधून महिला व बाल कल्याण समितीसहित विशेष समित्या नेमते व अशा समित्यांना तत्सम ठरावाद्वारे त्यांचे अधिकार व कर्तव्ये हयांचे वाटप करते. त्या समित्या पुढीलप्रमाणे आहेत:-

*सद्यस्थितीत, लगतपूर्व, महानगरपालिकेचा कालावधी दि. ७ मार्च २०२२ रोजी संपुष्टात आल्यानंतर दि. ८ मार्च २०२२ पासून, ह्या महानगरपालिकेवर, अद्ययावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ६ क (१) अन्वये महानगरपालिकेच्या सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी व सर्व कार्ये व कर्तव्ये पार पाडण्यासाठी, प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे.

१) स्थापत्य समिति (शहर),
२) स्थापत्य समिति (उपनगरे),
३) सार्वजनिक आरोग्य समिति,
४) बाजार व उद्यान समिति,
५) विधि समिति आणि
६) महिला व बाल कल्याण समिति.

ह्या शिवाय, अधिनियमाच्या प्रयोजनाशी संबंध असलेले, तिला योग्य वाटतील असे खास विषय, त्यासंबंधात चौकशी करुन अहवाल सादर करण्यासाठी किंवा त्याबाबत अभिप्राय देण्यासाठी मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३८ अन्वये **सल्लागार समित्या** वेळोवेळी नेमण्यात येतात.

**गटनेते**

धोरणात्मक बाबींसंबंधात निर्णय घेण्यासाठी सोयीनुसार वेळोवेळी **गटनेते** हयांच्या सभा आयोजित करण्यात येतात.

९ वैधानिक प्राधिकरणांपैकी स्थायी समिति, सुधार समिति, बेस्ट समिति, शिक्षण समिति व प्रभाग समिति हयांची कार्ये पुढीलप्रमाणे आहेत:-

**१. स्थायी समिति**

मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ४२ अन्वये स्थायी समिति घटित करण्यात येत असून, महानगरपालिकेच्या खजिन्याची पहारेकरी म्हणून ओळखली जाते आणि सर्वसाधारणपणे आर्थिक व्यवहार, महानगरपालिका अर्थसंकल्प आणि विकास कामे विषयक प्रस्तावांस महानगरपालिका अधिनियमाच्या विविध तरतुदीनुसार मंजुरी/संमती दिली जाते.

**२. सुधार समिति**

मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ४९ अ अन्वये सुधार समिति घटित करण्यात येत असून, शहराच्या सुधारणेसाठी महानगरपालिकेच्या मालमत्तेचे व्यवस्थापन, वापरातील बदल, आरक्षणातील बदल, महानगरपालिकेच्या मालमत्तांचा पुनर्विकास, महानगरपालिकेच्या मालमत्तांचा ताबा घेणे इत्यादी संबंधातील प्रस्तावांना विविध अधिनियमांच्या तरतुदीनुसार मंजुरी देते.

## ३. बेस्ट समिति

मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८च्या कलम ५० (१) अन्वये बेस्ट समिति घटित करण्यात येत असून, अधिनियमातील तरतुदीनुसार मुंबई शहराच्या अखत्यारितील विभागांमध्ये विद्युत पुरवठा केला जातो. पूर्व आणि पश्चिम उपनगरांसहित संपूर्ण शहरामध्ये तसेच नवी मुंबईपर्यंत विस्तारलेली वाहतूक सेवा दिली जाते.

## ४. शिक्षण समिति

मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ५० ह अन्वये शिक्षण समिति घटित करण्यात येत असून, मुंबई शहरामध्ये प्राथमिक शिक्षणाची सुविधा पुरविते. काही ठिकाणी मुंबई महानगरपालिका शिक्षण खात्याच्या नियंत्रणाखाली माध्यमिक शाळासुध्दा चालविते.

## ५. प्रभाग समिति

सन १९९२ मध्ये भारतीय राज्य घटनेमध्ये ७४ व्या घटना दुरुस्तीद्वारे अनेक मुलभूत बदल करण्यात आले आहेत. त्यानुसार, मुंबई महानगरपालिका अधिनियमात दुरुस्ती करुन कलम ५० टट समाविष्ट करण्यात येऊन १७ प्रभाग समित्यांची स्थापना करण्यात आली. नागरिकांशी निगडीत असलेले विषय म्हणजे पाणी पुरवठा, मलनि:सारण, स्वच्छता, पर्जन्य जलवाहिन्या, इतर मुलभूत नागरी सुविधा, अनधिकृत बांधकामासंबंधातील मुद्दे आणि मोडकळीस आलेल्या इमारतीसंबंधातील मुद्दे तसेच स्थानिक पातळीवरील नागरी सुविधा इत्यादी प्रश्नांची त्वरित अंमलबजावणी करणे ही प्रभाग समितीची महत्त्वाची कार्ये आहेत. प्रभाग समिति तिच्या प्रभागातील रुपये ५ लाखांपर्यन्तच्या खर्चाच्या नागरी कामांचे आराखडे व अंदाज ह्यांस प्रशासकीय मंजुरी देते.

## ६. वृक्ष प्राधिकरण

महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ अन्वये वृक्ष प्राधिकरण अस्तित्वात आले असून, मुंबई शहरातील पर्यावरणाचा समतोल साधण्याच्या दृष्टीने वृक्षारोपण तसेच, पुनर्रोपण करण्याच्या कार्याशी वृक्ष प्राधिकरण निगडीत आहे. महानगरपालिका आयुक्त हे वृक्ष प्राधिकरणाचे अध्यक्ष आहेत.

**महानगरपालिकेच्या उपरोक्त समित्यांची रचना व सदस्य संख्या पुढीलप्रमाणे आहे.**

| अनु क्र. | समितीचे नांव | दर्जा | सभांची संख्या | अध्यक्ष | समितीच्या सदस्यांची एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | स्थायी समिति | वैधानिक | साप्ताहिक | समितीच्या सदस्यांनी निवडलेले | २६+१ (शिक्षण समितीचे अध्यक्ष पदसिध्द सदस्य) |
| २ | सुधार समिति | वैधानिक | मासिक | समितीच्या सदस्यांनी निवडलेले | २६ |
| ३ | शिक्षण समिति | वैधानिक | मासिक | समितीच्या सदस्यांनी निवडलेले | २२+४ (बिगर पालिका सदस्य) |
| ४ | विद्युत पुरवठा आणि परिवहन समिति | वैधानिक | पंधरवडा | समितीच्या सदस्यांनी निवडलेले | १६+१ (अध्यक्ष, स्थायी समिति- पदसिध्द सदस्य) मात्र अशा व्यक्तींपैकी किमान एक व्यक्ति महानगरपालिकेची सदस्य असेल. मग बाकीच्या व्यक्ति अशा सदस्य असतील किंवा नसतील. |
| ५ | वृक्ष प्राधिकरण समिति | वैधानिक | पंधरवडा | महानगरपालिका आयुक्त | महापालिकेच्या सदस्यांमधून ५ पेक्षा कमी नाहीत आणि १५ पेक्षा जास्त नाही इतके सदस्य आणि सदर नियुक्त केलेल्या सदस्यांच्या संख्येपेक्षा अधिक असणार नाहीत इतके नामनिर्देशित सदस्य. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | एकूण १७ प्रभाग समित्या | ७४ व्या घटना दुरुस्ती नुसार महानगर पालिकेने स्थापन केलेल्या वैधानिक समित्या | मासिक | समितीच्या नगरसेवक सदस्यांनी निवडलेले | संबंधित प्रभाग समितीच्या प्रादेशिक क्षेत्रातील निवडणूक प्रभागांचे प्रतिनिधीत्व करणारे नगरसेवक आणि सदर नगरसेवकांनी नामनिर्देशित केलेले ३ पेक्षा अधिक नाही इतके बिनसरकारी व समाजलक्षी संघटनांचे सदस्य. |
| ७ | स्थापत्य समिति (शहर) | विशेष | मासिक | समितीच्या सदस्यांनी निवडलेले | ३६ |
| ८ | स्थापत्य समिति (उपनगरे) | विशेष | मासिक | समितीच्या सदस्यांनी निवडलेले | ३६ |
| ९ | सार्वजनिक आरोग्य समिति | विशेष | मासिक | समितीच्या सदस्यांनी निवडलेले | ३६ |
| १० | बाजार व उद्यान समिति | विशेष | मासिक | समितीच्या सदस्यांनी निवडलेले | ३६ |
| ११ | विधि समिति | विशेष | मासिक | समितीच्या सदस्यांनी निवडलेले | ३६ |
| १२. | महिला व बाल कल्याण समिति | विशेष | मासिक | समितीच्या सदस्यांनी निवडलेली महिला सदस्य | ३६(७५% पेक्षा कमी नाही इतके महिला सदस्य) |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १३ | सल्लागार समित्या | - | महापौर निश्चित करतील त्यावेळी | महापौर | महापालिकेस वेळोवेळी आपल्या सदस्यांपैकी तिला योग्य वाटतील इतके सदस्य. |
| १४ | गटनेते | - | महापौर निश्चित करतील त्यावेळी | महापौर | महापौर, उप-महापौर, सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता, अध्यक्ष वैधानिक समित्या, महानगरपालिकेतील मान्यताप्राप्त पक्षाचे गट नेते. |

- प्रभाग समित्यांच्या सभा संबंधित विभाग कार्यालयांत भरविण्यात येतात.
- 'बेस्ट' समितीची सभा 'बेस्ट भवन' येथे भरविण्यात येते.
- इतर सर्व सभा महानगरपालिका मुख्यालयात भरविण्यात येतात.
- फक्त महानगरपालिकेची सभा जनतेसाठी खुली असते. जनता विद्यमान गटनेते आणि महापौरांच्या शिफारसीवरुन आणि महानगरपालिका सचिवांच्या परवानगीने सभेस उपस्थित राहू शकते.
- उपरोल्लेखित सर्व सभांचे वृत्तांत महानगरपालिका सचिवांकडून तयार केले जातात.